**जुलै, २०२१ मध्ये उद्भवलेल्या पुरामुळे झालेल्या नुकसानीसाठी बाधित नागरिकांना मदत देण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**

**महसुल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०२१/प्र.क्र.२०३/(भाग-१) /म-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : १७ नोव्हेंबर, २०२१

संदर्भ : १) शासन निर्णय, क्रमांक : सीएलएस-२०१५/प्र.क्र.४० /म -३, दिनांक १३.०५.२०१५

२) शासन निर्णय, क्रमांक : सीएलएस-२०१७/प्र.क्र.२६७ /म -३, दिनांक २५.०१.२०१८

३) शासन निर्णय क्रमांक सीएलएस-२०२१/प्र.क्र.२०३/म -३, दिनांक ११.०८.२०२१

प्रस्तावना:

जुलै, २०२१ मध्ये झालेलया अतिवृष्टीमुळे राज्यात विविध जिल्हयात उद्भवलेलया पुररिस्थितीमुळे नुकसान झालेल्या बाधित नागरिकांना मदत देण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर दिनांक ०३.०८.२०२१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

शासन निर्णय:

जुलै, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात विविध जिल्हयात उद्भवलेल्या पुरपरिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीसाठी बाधित झालेल्या नागरिकांना संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये मदत करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील दुकानदार व टपरीधारक यांच्या संदर्भात मदत करण्याचे निकष पुढील प्रमाणे शिथिल करण्यास मंत्रीमंडळ उपसमितीच्या दि.२७.१०.२०२१ च्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे सुधारित निकषानुसार दुकानदार व टपरीधारक यांना मदत प्रदान करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मदतीची बाब व निकष | दि.११.०८.२०२१ च्या शासन निर्णयातील मूळ शिथिल निकष व मदतीचे दर | सुधारित शिथील निकष व मदतीचे दर |
|---|---|---|---|
| १० | दुकानदार | जे स्थानिक रहिवासी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत अशा दुकानदारांपैकी अधिकृत (नोंदणीकृत व | जे स्थानिक रहिवासी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत अशा दुकानदारांपैकी अधिकृत (नोंदणीकृत व महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ खालील परवानाधारक) दुकानदार यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ खालील परवानाधारक) दुकानदार यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त रु. ५०,०००/- पर्यंत आर्थिक मदत देण्यात यावी. | नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त रु. ५०,०००/- पर्यंत आर्थिक मदत देण्यात यावी.<br>ज्या दुकानदाराकडे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ खालील परवाना नसेल अथवा परवान्याचे नूतनीकरण केलेले नसेल त्यांच्या बाबतीत मदतीसाठी खालील पैकी कोणताही एक परवाना ग्राहय धरण्यात यावा :-<br>१. अन्न व औषध प्रशासनाकडून देण्यात येणारे अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र (FOOD SAFETY AND STANDARD ACT २००६ )<br>२. केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघू, व मध्यम उदयम मंत्रालय यांचेकडून दिले जाणारे उद्योग आधार प्रमाणपत्र (MINISTERY OF MICRO SMALL MEDIUM ENTERPRISES)<br>३. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियम) अधिनियम २०१७ अन्वये देण्यात आलेले नोंदणीप्रमाणपत्र **नमुना ब** (कामगार यांची संख्या नमूद केली आहे.)<br>४. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम २०१७ अन्वये सूचना देण्यात आलेली पावती **नमुना ग**<br>५. केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघू, व मध्यम उदयम मंत्रालय यांचेकडून गृहउद्योगाकरिता दिले जाणारे उदयम प्रमाणपत्र.<br>तथापि, मदतीची रक्कम वितरीत करण्यापूर्वी संबंधित दुकानदार यांनी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ खालील परवान्याचे नूतनीकरण करणे अथवा नवीन परवाना मिळविणे आवश्यक राहिल. |
| ११ | टपरी धारक | जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत अशा टपरीधारकापैकी | जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्ड धारक आहेत अशा टपरीधारकापैकी अधिकृत (नोंदणीकृत व परवानाधारक) टपरीधारक यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अधिकृत (नोंदणीकृत व परवानाधारक) टपरीधारक यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त रु. १०,०००/- पर्यंत आर्थिक मदत देण्यात यावी. | नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त रु. १०,०००/- पर्यंत आर्थिक मदत देण्यात यावी.<br>जे टपरीधारक नोंदणीकृत व परवानाधारक नाहीत, त्यांच्या बाबतीत खालील पुरावे मदतीसाठी ग्राहय धरण्यात यावेत:-<br>१.स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील देण्यात आलेले हातगाडी लायसन्स.<br>२.स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत वसूली केल्यानंतर देण्यात येणारी दैनंदिन सामान्य करपावती.<br>३. स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उन्हाळी तात्पुरता व्यवसाय करणेकरिता देण्यात येणारी परवानगी.<br>४. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीतील खाजगी व सार्वजनिक जागेवर जे व्यवसायिक व्यवसाय करतात त्यांचेकडून वसूल करण्यात येणारी दर्शनी भू भाडे पावती. |

२. मदतीची रक्कम प्रदान करतांना संदर्भाधीन क्र.१ व २ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील. तसेच सदर प्रकरणी संदर्भ क्र.३ शासन निर्णयातील २ ते ४ येथील अटी व शर्ती जशाच्या तशा लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक : ४५६/२०२१/व्यय-९, दि.१६.११.२०२१ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२१११७१७४३०५३६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by Sanjay Audumbar Dharurkar
Date: 2021.11.17 17:46:45 +05'30'

**( संजय औ. धारूकर )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
२. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानभवन,मुंबई
३. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
४. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
५. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय,मुंबई,
६. विभागीय आयुक्त सर्व ,

७. जिल्हाधिकारी सर्व,
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
९. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१०. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
११. जिल्हा कोषागार अधिकारी सर्व ,
१२. मा.मंत्री ( मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१३. मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१४. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१५. कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१६. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
१७. निवड नस्ती (कार्यासन/ म-३).